International Research Journal of Human Resource and Social Sciences
ISSN(O): (2349-4085) ISSN(P): (2394-4218)
Impact Factor 5.414 Volume 7, Issue 02, Feb 2020
Website- www.aarf.asia, Email : editoraarf@gmail.com

# “रामभाऊ घाटगे यांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदान : एक ऐतिहासिक अध्ययन”

**उमेश गणेशराव जांभोरे**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय,
वारणानगर

**प्रस्तावना:**

भारतीय स्वातंत्र्य चळवळ ही जगातील एक महान, व्यापक आणि दीर्घकालीन संघर्षगाथा आहे. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धापासून सुरू झालेली ही चळवळ १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाल्याने यशस्वी झाली. या चळवळीला अनेक विचारधारा, सामाजिक स्तर आणि भौगोलिक प्रदेशातून पाठिंबा मिळाला. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालील असहकार, सविनय कायदेभंग, ‘भारत छोडो’ आंदोलन यांसारख्या अहिंसक आंदोलनांनी जनजागृती केली, तर भगतसिंग, सुभाषचंद्र बोस यांसारख्या अनेक क्रांतिकाऱ्यांनी सशस्त्र क्रांतीचे नेतृत्व करून ती गतिमान केली.

या संघर्षात केवळ राष्ट्रीय नेतेच नव्हे, तर गावखेड्यांतील शेतकरी, कामगार, स्त्रिया, विद्यार्थी आणि विविध प्रांतिक नेते यांचेही मोठे योगदान होते. विशेषतः महाराष्ट्रातील कोल्हापूर व सातारा भागांतील स्थानिक चळवळींनी ब्रिटिश सत्तेला मोठे आव्हान दिले. ही चळवळ केवळ राजकीय स्वातंत्र्यासाठी नव्हती, तर सामाजिक, आर्थिक आणि मानसिक गुलामगिरीपासून मुक्त होण्याचा प्रयत्नही होती. अशा आंदोलनातूनच भारतीय समाजात स्वातंत्र्य, समता आणि स्वाभिमानाचे बीज रोवले गेले. त्यामुळे, भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा अभ्यास करताना त्यामागील जनआंदोलन, वैचारिक प्रवाह आणि स्थानिक नेतृत्व व त्यांचे योगदान यांचाही सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे. असेच, एक महत्त्वपूर्ण स्थानिक नेतृत्व म्हणजे कोल्हापूर जिल्ह्यातील कोडोली गावातील रामभाऊ घाटगे होते. महात्मा गांधींच्या अहिंसेच्या तत्वज्ञानाचा, नेहरूंच्या आधुनिक दृष्टिकोनाचा आणि नेताजींच्या क्रांतिकारकतेचा प्रभाव यातून निर्माण झालेल्या जाणीवेनुसार त्यांनी स्थानिक पातळीवर स्वातंत्र्य चळवळ उभारली. कोल्हापूर (वारणा-कोडोली) परिसरातील प्रजापरिषद

© Association of Academic Researchers and Faculties (AARF)
A Monthly Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access International e-Journal - Included in the International Serial Directories.

चळवळ, भूमिगत कार्य, पोलिसी दडपशाहीला दिलेला निर्भय प्रतिकार आणि स्वातंत्र्यासाठीचा त्यांचा संघर्ष यामुळे ते एक प्रभावी आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व ठरले.

प्रस्तुत शोधनिबंधाचा उद्देश रामभाऊ घाटगे यांच्या भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदानाचे ऐतिहासिक विश्लेषण करणे, त्यांच्या कार्याचे आजच्या काळातील संदर्भात पुनर्मूल्यांकन करणे आणि स्थानिक इतिहासाच्या दृष्टिकोनातून त्यांचे कार्य प्रकाशात आणणे हा आहे.

**उद्दिष्टे :**

१. रामभाऊ घाटगे यांच्या वैचारिक जडणघडीत राष्ट्रीय नेत्यांचा व समकालीन घटनांचा प्रभाव विशद करणे.
२. कोल्हापूर परिसरातील प्रजापरिषद चळवळीच्या विशेष संदर्भात भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील रामभाऊ घाटगे यांच्या योगदानाचे मूल्यमापन करणे.
३. कोल्हापूर परिसरातील स्वातंत्र्य चळवळीच्या विशेष संदर्भात भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील रामभाऊ घाटगे यांचे योगदान अधोरेखित करणे.
४. रामभाऊ घाटगे यांच्या राष्ट्रनिष्ठेचे व देशभक्तीचे आधुनिक संदर्भात पुनर्मूल्यांकन करणे.

**रामभाऊ घाटगे यांची वैचारिक जडणघडण :**

रामभाऊ उर्फ रामचंद्र बाबुराव घाटगे यांचा जन्म कोडोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथे झाला. त्याच्या जन्म तारखेबाबत निश्चित माहिती नाही परंतु ते एक अत्यंत मनमिळावू, शिस्तप्रिय व प्रामणिक गृहस्थ होते. तसेच ते कोडोली येथील विश्वनाथ आण्णाप्पा कोरे उर्फ तात्यासाहेब यांचे विश्वासू सहकारी आणि मित्र होते.

रामभाऊ उर्फ रामचंद्र बाबुराव घाटगे यांच्या विचारविश्वावर महात्मा गांधी, पं. जवाहरलाल नेहरू आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा प्रभाव होता. या थोर नेत्यांचे क्रांतिकारी कार्य, राष्ट्रनिष्ठा आणि वैचारिक नेतृत्व यामुळे ते आणि त्यांच्यासारखे अनेक समकालीन युवक भारावून गेले होते. गांधीजींची अहिंसात्मक चळवळ, पं. नेहरूंचा आधुनिक राष्ट्रनिर्मितीचा दृष्टिकोन आणि नेताजींची धाडसी सशस्त्र लढ्याची भूमिका या तिघांचे वेगवेगळे परंतु राष्ट्रहितार्थ एकसंध प्रयत्न, रामभाऊंना प्रेरणादायी वाटले. या प्रेरणेनेच त्यांच्या मनात देशासाठी काही तरी करावे, ही तीव्र इच्छा निर्माण झाली. हीच भावना त्यांच्या क्रियाशीलतेला चालना देणारी ठरली आणि त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. यातूनच ते केवळ अनुकरणकर्ते नव्हते, तर स्वतः स्वतंत्र वैचारिक भूमिका घेणारे व त्याप्रमाणे ठोस कृती करणारे स्वातंत्र्यसैनिक बनले.

**रामभाऊ घाटगे यांचे प्रजापरिषद चळवळीतील योगदान :**

दक्षिण महाराष्ट्रातील कोल्हापुर संस्थान हे सर्वाहून श्रेष्ठ असे मराठ्यांचे सत्ताकेंद्र होते.[१] छत्रपती राजाराम महाराजांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी महाराणी ताराबाई यांनी कोल्हापुरची गादी स्थापन करून करवीर राज्याची निर्मिती केली.

राजर्षी शाहू महाराज (१८७४–१९२२) यांच्या रूपाने कोल्हापूर संस्थानाला एक दूरदर्शी, थोर आणि पुरोगामी नेतृत्व लाभले. सामाजिक न्याय, शैक्षणिक प्रगती आणि आर्थिक समतेच्या दिशेने त्यांनी घेतलेली धोरणात्मक पावले भारतीय इतिहासात मैलाचा दगड ठरली. त्यांच्या निधनानंतर छत्रपती राजारामांनी इ.स. १९४० पर्यंत राज्य केले राजाराम महाराजांच्या कारकिर्दीच्या शेवटच्या कालखंडात प्रजापरिषद आंदोलनास सुरूवात झाली.[२]

६ फेब्रुवारी १९३९ रोजी जयसिंगपूर येथील कार्यकर्त्यांच्या बैठकीत माधवराव भागल यांनी 'कोल्हापूर संस्थान परिषद स्थापने'ची घोषणा केली.[३] कोल्हापूर संस्थानातील राजकीय विकासाच्या प्रक्रियेत १९३९ ते १९४९ या काळात प्रजापरिषद या संघटनेचा फार मोठा वाटा आहे. संस्थानात 'जबाबदार राज्यपध्दतीची' सातत्याने मागणी करून या संघटनेने जनतेत जागृती व लोकशाहीमूल्ये जीवनप्रणाली म्हणून स्विकारण्याचा आग्रह धरला. या प्रजापरिषदेतूनच बहुजन समाजात अनेक नवीन नेतृत्व उभे राहु शकले. ज्यामध्ये माधवराव बागल, रत्नाप्पा कुंभार यांचे प्रमाणेच रामभाऊ उर्फ रामचंद्र बाबुराव घाटगे हे प्रजापरिषदचे तळमळीचे कार्यकर्ते म्हणुन ओळखले जाते.

प्रजापारिषद जनतेच्या मनातील असंतोष व्यक्त करण्याचे प्रजा परिषद हे एक प्रभावी व्यासपीठ होते. संस्थांनी राजवटीतील दोष दूर झाले पाहिजेत असे छातीठोकपणे सांगणारी व त्यासाठी प्राणांची बाजी लावून झगडणारी ही एक स्वतंत्र चळवळ होती.[४] स्वातंत्र्यप्राप्ती आणि लोकशाहीची स्थापना ही प्रजा परिषदेची ध्येय होती. राष्ट्रीय काँग्रेसचा प्रवेश कोल्हापूर संस्थानात स्पष्टपणे झाला नव्हता अशा काळात प्रजापरिषदेचे काम चालू होते. त्याअंतर्गत रामभाऊ उर्फ रामचंद्र बाबुराव घाटगे हे आपल्या जबाबदारी जाणीव ठेवून जनक्रांतीच्या या लढ्यात यथाशक्ती सामील झाले.

१९३९ मध्ये शेतकऱ्यांचे मोर्चे निघू लागले व कार्यकर्त्यांची धरपकड झाली. त्यामध्ये भाई माधवराव बागल यांना अटक झाल्यामुळे तर जनता फारच चिडली. त्यावेळी सरकारने शेतसारा कमी करणे व नागरिकांना त्यांचे हक्क देण्यासंदर्भात दिलेले वचन न पाळता दडपशाही व दहशत निर्माण केली. त्यामुळे शासनाच्या विरोधात सभा होऊ लागल्या. अशीच एक सभा कोडोली येथे पण झाली. या सभेत प्रजापरिषदेच्या धोरणाचे समर्थन व शासनाच्या 'तोडा-फोडा-झोडा' या वृत्तीचा निषेध करण्यात आला. या सभेत रामभाऊ घाटगे, शंकर अनंत मिरगुंडे, वा. रा. कुलकर्णी व तात्यासाहेब कोरे यांची शासनाच्या दडपशाही वृत्तीचा निषेध करणारी खळबळजनक भाषणे झाली.[५]

त्या भाषणांची आठवण 'मी : एक कार्यकर्ता' या आपल्या आत्मनिवेदनपर ग्रंथात सांगतांना विश्वनाथ आण्णाप्पा उर्फ तात्यासाहेब कोरे म्हणतात, "माझे मित्र रामभाऊ घाटगे त्या दिवशी खूप त्वेषाने व चिडून बोलले. शाषनाने दिलेली वचने कशी पाळली नाहीत आणि ही सनदशीर चळवळ चिरडून टाकण्यासाठी जी दडपशाही सुरु केली आहे, त्याबाबत त्यांनी

सरकारची कडक शब्दात हजेरी घेतली. त्या दिवशी त्यांच्या शब्दांना तीक्ष्ण धार होती आणि त्यांची वाक्ये तलवारीच्या प्रहराप्रमाणे शासकीय धोरणाची खांडोळी करत होती. पोलिस खात्याची त्यांनी रेवडी उडवली."[६] या सभेचा वृत्तांत कोल्हापूर दरबारी जाऊन पोहोचला. कठोर कारवाई होणार हे निश्चित होते, मात्र याप्रसंगी रामभाऊ घाटगे जराही घाबरले नाही तसेच त्यांनी पळही काढला नाही. येईल त्याप्रसांगला सामोरे जाण्यासाठी ते सिद्ध झाले.

कोडोली येथील सभा संपवून सात-आठ दिवसांनी संस्थांनी पोलीस वॉरंट घेऊन कोडोलीत हजर झाले. यावेळी सभेत भाषण करणाऱ्यांना रामभाऊ घाटगे यांच्यासह इतर मंडळीना अटक करून किणी वाठार येथील चावडीत नेण्यात आले. तेथे रामभाऊ घाटगे, वा. रा. कुलकर्णी व शंकर अनंत मिरगुंडे यांना पोलिसांनी रस्त्यावर उभे करून क्रूरपणे बेदम मारहाण केली.[७]

रामभाऊ घाटगे यांनी सरकार व पोलीस खात्यावर प्रखर टीका केल्यामुळे पोलिसांनी त्यांना सर्व बाजूंनी काठ्यांनी मारहाण करायला सुरुवात केली, त्यावेळी तात्यासाहेबांनी पोलिसांच्या मध्ये पडून त्यांना वाचविण्याचा प्रयत्न केला, परंतु पोलिसांनी त्यांच्या दंडाला पकडून खुर्चीत डांबून बसवून ठेवले. आणि रामभाऊला वाकून उभे करीत पुन्हा काठ्यांनी जोरदार मारहाण केली. यामध्ये त्यांच्या अंगावर लालबुंद वळ सुजून आले आणि शेवटी ते बेशुद्ध झाले. रामभाऊ शुद्धीवर आल्यावर पोलिसांनी त्यांच्या अंगावर मिठाचे पाणी टाकले. असह्य वेदनांनी ते ओरडत असतांना पोलिसांनी त्यांना पुन्हा बेदम मारहाण केली. ज्यात ते परत बेशुद्ध पडले. यावेळी श्री. कुलकर्णी व श्री. मिरगुंडे यांनाही पोलिसांनी तशाचप्रकारे मारहाण केली.[८]

रामभाऊ, कुलकर्णी व मिरगुंडे यांना जयसिंगपुर येथील तुरुंगात ठेवण्यात आले होते. परंतु तेथेही त्यांना निर्दयपणे बेदम मारहाण करण्यात आली. त्यानंतर संस्थांनी पोलिसांनी रामभाऊ यांचेसह इतरांवर राजद्रोहाच्या आरोपाखाली खटला भरण्याची पूर्वतयारी सुरू केली. त्यावेळी तात्यासाहेब कोरे यांनी भीमराव आवटी-पाटील यांच्या मदतीने अनेक पोलिस अधिकाऱ्यांना भेटून रामभाऊ वरील खटला उभा न राहील अशी व्यवस्था केली होती.[९] पोलिसांनी केलेल्या बेदम मारहाणीमुळे रामभाऊच्या पाठीच्या मणक्याला गंभीर इजा झाली ज्याचा त्रास शेवट पर्यंत त्यांना झाला. पुढील काळात शासनाने प्रजापरिषदेच्या काही मागण्या केल्या होत्या.

शारीरिक पीडा, पोलिसांचा दडपशाहीचा मारा आणि अपमान अशा अमानुष आणि अत्याचारमय परिस्थितीतही रामभाऊ घाटगे यांच्या अंगी असलेली राष्ट्रनिष्ठा व देशभक्ती किंचितही डगमगली नाही. किंबहुना त्यांच्यातील जाज्वल्य राष्ट्रप्रेम अधिक दृढ झाले. त्यांची निष्ठा केवळ तात्कालिक आंदोलनापुरती मर्यादित नव्हती, तर ती खोलवर रुजलेली देशसेवेची भावना होती. त्यामुळेच त्यांनी अन्यायाविरुद्ध झुंज देण्याची प्रेरणा टिकवून ठेवली आणि स्वातंत्र्यलढ्यात अधिक जोमाने सहभाग घेतला.

**रामभाऊ घाटगे यांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान :**

१९४२ च्या 'छोडो भारत' आंदोलनाने भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या अखेच्या पर्वाला सुरुवात झाली.[१०] महात्मा गांधींनी ब्रिटीश सत्तेविरुद्ध 'चले जाव'ची घोषणा देताच देशाच्या कानाकोपऱ्यात स्वातंत्र्याचे वारे संचारले. त्यांच्या 'करा अथवा मरा' या संदेशामुळे स्वातंत्र्य चळवळ अधिक गतिमान झाली. ब्रिटिशांनी ही चळवळ दडपून टाकण्यासाठी अटकसत्र सुरु केले. म. गांधी यांचेसह इतर अनेक महत्वाच्या नेत्यांना अटक करून स्थानबद्ध करण्यात आले. ज्याची परिणती भूमिगत चळवळीच्या उदयात घडून आली. याच दरम्यान क्रांतिसिंह नाना पाटील यांनी आपल्या सहकाऱ्यासोबत सातारा येथे प्रतिसरकारची (पत्रीसरकार) स्थापन केले.[११] ज्यामाध्यमातून ब्रिटीश सरकारचा कोणताही आदेश न पाळता गावाचा स्वतंत्र कारभार चालवला जायचा. ज्यामुळे ब्रिटीश शासनाची यंत्रणा पूर्णपणे खिळखिळी झाली. परिणामी ब्रिटीश शासनाने दडपशाहीचे धोरण स्वीकारून अटकसत्र सुरु केले. तेव्हा कोरे कुटुंबीयांचा वारणा नदीकाठचा 'डागमळा' भूमिगत क्रांतीकारकांचे आश्रयस्थान ठरला.

इंग्रजांनी चालवलेला पाठलाग चुकवण्यासाठी वारणा काठचा 'डाग मळा' हा त्यांचा आसरा होता. डाग मळयातील ऊसाचा फड ही क्रांतीकारकांची लपण्याची हमखास जागा असे. साताऱ्याहून डाग मळयात आले की संस्थांनी हद्दीत प्रवेश होत असे, त्यामुळे संस्थांनी पोलिसांना खबर मिळून त्यांचा ससेमिरा लागेपर्यंत बरीच उसंत मिळत असे. अशावेळी कार्यकर्त्यांची सर्व प्रकारची सेवा करण्याची संधी कोरे कुटुंबियांनप्रमाणेच रामभाऊ उर्फ रामचंद्र बाबुराव घाटगे यांनाही मिळाली. ते विश्वनाथ आण्णाप्पा कोरे उर्फ तात्यासाहेब यांचे विश्वासू सहकारी आणि मित्र होते.

तात्यासाहेब कोरे यांनी 'डागमळया'मध्ये भूमिगत क्रांतिकारकांना आश्रय दिला होता. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, के. डी. पाटील हे नेहमी डाग मळयावर आश्रयास असत. या डाग मळयात २५ ते ३० भूमिगत कार्यकर्ते नेहमी असत.[१२] त्या क्रांतिकारकांना सर्वतोपरी सहकार्य करण्याची जबाबदारी तात्यासाहेब कोरे यांच्यावर होती. त्यादृष्टीने क्रांतिकारकांना पिस्तुले, बंदुकी, दारुगोळा यासारखी शास्त्रास्त्रे पुरविणे, त्यांच्या संरक्षणाची तजवीज करणे तसेच भोजनाची व्यवस्था करणे इत्यादी कामी तात्यासाहेब कोरे यांना रामभाऊ घाटगे यांनी सहकार्य केले. आणि ते करीत असताना कुठलाही कसूर न करता अत्यंत प्रामाणिकपणे जवाबदारी वठविली. पर्यायाने क्रांतिकारी चळवळ व देशाची स्वातंत्र्य चळवळ अधिक गतिमान करण्यात यथाशक्ती योगदान दिले.

**रामभाऊ घाटगे यांच्या राष्ट्रनिष्ठेचे व देशभक्तीचे आधुनिक संदर्भात पुनर्मूल्यांकन :**

रामभाऊ घाटगे यांची राष्ट्रनिष्ठा व देशभक्ती ही केवळ स्वातंत्र्यपूर्व संघर्षापुरती मर्यादित नव्हती, तर ती एका व्यापक सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टिकोनातून होती. आजच्या आधुनिक काळात, जेव्हा व्यक्तिस्वार्थ, राजकीय भ्रष्टाचार आणि समाजमनातील उदासीनता वाढत आहे, तेव्हा रामभाऊ घाटगे यांचे नि:स्वार्थ राष्ट्रसेवेचे व्रत व तत्त्व अत्यंत महत्त्वाचे ठरते. ब्रिटिश सत्तेच्या विरोधात त्यांनी घेतलेली निर्भीड भूमिका, पोलिसी दडपशाहीला न

डगमगता दिलेला प्रतिकार आणि लोकहितासाठी त्यांनी पत्करलेले हाल अपेष्टा हे त्यांचे राष्ट्रप्रेम व देशभक्ती दर्शवणारे ठळक उदाहरण आहे.

एकंदरीत अन्यायाविरोधात झुंज देताना सहन केलेली दडपशाही आणि तरीही न ढळणारी त्यांची निष्ठा, आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे. देशप्रेम म्हणजे केवळ सत्ता किंवा प्रसिद्धी मिळवण्याचे साधन नसून, जनतेच्या दु:खाशी नाळ जोडून कार्य करणे, हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले. म्हणूनच रामभाऊ घाटगे यांची राष्ट्रनिष्ठा ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवजात साठवून ठेवण्याची बाब नसून, तिचे पुनर्मूल्यांकन आजच्या सामाजिक, राजकीय व नैतिक अध:पतनाच्या पार्श्वभूमीवर करणे अत्यावश्यक ठरते.

**निष्कर्ष :**

रामभाऊ घाटगे हे केवळ कोल्हापूर परिसरातील (कोडोली) एक सक्रिय स्वातंत्र्यसैनिक नव्हते, तर ते राष्ट्रीय स्तरावरील विचारधारेचे प्रतिबिंब होते. त्यांच्या वैचारिक जडणघडीत महात्मा गांधी, पं. जवाहरलाल नेहरू आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांसारख्या राष्ट्रीय नेत्यांचा ठसा स्पष्टपणे जाणवतो. त्यांनी केवळ या नेत्यांच्या विचारांचे अनुकरण न करता, त्यातून प्रेरणा घेऊन स्थानिक पातळीवर प्रभावी कार्य केले.

कोल्हापूर परिसरातील प्रजापरिषद चळवळीमध्ये रामभाऊ घाटगे यांनी सामान्य जनतेच्या प्रश्नांना आवाज दिला. अन्यायाविरोधात उठवलेला त्यांचा आवाज, पोलिसांच्या अमानुष दडपशाहीला तोंड देण्याचे त्यांचे धैर्य आणि शेतकरी, कामगार यांच्यासाठी घेतलेली भूमिका, हे त्यांच्या योगदानाचे महत्त्व स्पष्ट करते.

स्वातंत्र्य चळवळीच्या रूपाने उदयाला आलेल्या भूमिगत चळवळीतील क्रांतिकारकांचे ते सच्चे पाठीराखा ठरले. त्यादृष्टीने बघता स्वातंत्र्य चळवळीत त्यांनी घेतलेली भूमिका ही फक्त ऐतिहासिक घटना नव्हे, तर आजच्या समाजासाठी प्रेरणादायी मूल्यांची शिकवण आहे. त्यांच्या राष्ट्रनिष्ठेचे आणि देशभक्तीचे पुनर्मूल्यांकन करताना आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, सामाजिक समतेसाठीचा लढा, लोकशाही मूल्यांची जपणूक आणि निर्भीड नेतृत्व यांची आजही देशाला तितकीच गरज आहे जितकी स्वातंत्र्यलढ्याच्या काळात होती. म्हणूनच रामभाऊ घाटगे यांचे जीवन व कार्य हे आजच्या पिढीसाठी एक दिशा आणि मूल्यनिष्ठ प्रेरणा ठरते.

एकंदरीत रामभाऊ उर्फ रामचंद्र बाबुराव घाटगे यांचे भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील योगदान उल्लेखनीय असल्याचे सिद्ध होते.

**संदर्भ :**


१. पटवर्धन वि. अ., संथानातील लोकशाहीचा लढा, संस्थांनी स्वराज्य कचेरी, पुणे, १९४०, पृ. ०१
२. पाटील राणी गुंगा, कोल्हापूर संस्थान प्रजापरिषद चळवळीतील एक राजकीय नेतृत्व : त्र्यं. सी. कारखानीस (लेख), निवडक शोधनिबंध संग्रह, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद, कोल्हापूर, २०११, पृ. १४२
३. पाटील राणी गुंगा, उपरोक्त, पृ. १४२
४. कोरे तात्यासाहेब (आत्मनिवेदन), दातार मुकुंद (शब्दांकन), मी : एक कार्यकर्ता, जन्मशताब्दी वर्ष: पुर्नरमुद्रित आवृत्ती, कोल्हापूर, २०१४, पृ. ८१
५. मिरगुंडे प्रभाकर शंकर, पालवी वटवृक्षाची अष्टपैलू स्वातंत्र्यसैनिकाची, अथर्व प्रकाशन, कोल्हापूर, जानेवारी २०१२, पृ. ९१
६. कोरे तात्यासाहेब, उपरोक्त, पृ. ८२
७. मिरगुंडे प्रभाकर शंकर, उपरोक्त, पृ. ९२
८. कोरे तात्यासाहेब, उपरोक्त, पृ. ८३
९. कित्ता, पृ. ८४
१०. केतकर कुमार, कथा स्वातंत्र्याची, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ व अभ्यास संशोधन मंडळ, पुणे, २०१०, पृ. २४९
११. पाटणकर भारत, महाराष्ट्राचे शिल्पकार नाना पाटील, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संकृती मंडळ, मुंबई, २००२, पृ. २३
१२. कोरे तात्यासाहेब, उपरोक्त, पृ. १००